क जिपना/पीएनजीडी/शिक्षण/प्राथ/मान्यता/ 7677 /16
कार्यालय जिल्हा परिषद नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक:— 03/10/2016

प्रति,

अध्यक्ष/सचिव
भारतीय विदया भवन
लाला लजपत राय मार्ग
सिव्हील लाईन्स नागपूर

विषय: सन 2016 2017 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रथम खाते मान्यता परावानगी देण्याबाबत.

संदर्भ: 1) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क 1, 6 व 24) 2012
2) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व किडा विभाग यांचा शासन निर्णय क एसएफएस/1016/प्र क 69 एसएम 2, मंत्रालय, मुंबई 32 दिनांक 17 जून 2016
3) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र कमांक माध्य/अ 2/6044/2016 दिनांक 4 7 2016

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2016 2017 मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यातकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क 2 च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे करीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर प्रथम खाते मान्यतेची परवानगी दिलेली आहे.

| अ क | जिल्हा | अर्जदाराचे संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचे प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मंडळ संलग्न | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नागपूर | भारतीय विदया भवन लाला लजपतराय मार्ग सव्हिल लाईन नागपूर | भवन्स भगवानदास पुरोहित विदया मंदिर नांदा फाटा खापरखेडा रोड कोराडी ता कामठी जिल्हा नागपूर | इंग्रजी | नविन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (सर्व शाखा) इयत्ता 1 ते 8 | सी.बी.एस.ई | 2016–17 |

अटी व शर्ती
1) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
2) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद् समजण्यात येईल.
3) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष 2016 2017 पासून असेल.
4) शैक्षणिक वर्ष 2016 2017 मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

BHAGWANDAS PUROHIT VIDYA MANDIR KORADI

5) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याचा आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्बातल ठरले.
6) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम 2013 सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
7) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पत्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर स्वयंअर्थसाहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.
8) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
9) महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना यू डायस मध्ये माहिती भरताना स्वंयअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहाली.

—सही—
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

प्रतिलीपी

1) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व किडा विभाग, मंत्रालय मुंबई 32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा. शिक्षण संचालक (प्राथ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे 1 यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
4) मुख्याध्यापक भवन्स भगवानदास पुरोहित विदया मंदिर नांदा फाटा खापरखेडा रोड कोराडी ता कामठी जिल्हा नागपूर यांना माहितीस्तव अग्रेषित.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

BHAVAN'S BHAGWANDAS PUROHIT VIDYA MANDIR KORADI NAGPUR-441111

PRINCIPAL
Bhavan's B.P. Vidya Mandir
Nanda Khaparkheda Road, Koradi, Nagpur-11

Abhutani
Smt. Anju Bhutani
Manager